UpLift
Enriching lives of the poor...together
अपलिफ्ट इंडिया असोसिएशन - स्वाभिमान द्वारा

# मनोगत

अंक - ८
फेब्रुवारी: २००७

२१ - जागतिक मातृभाषा दिन
२८ - राष्ट्रीय **विज्ञान दिवस**

## संपादकीय...

नमस्कार मंडळी,

"आपने कभी सपने देखे हैं? मैंने भी देखे है| और उनको पूरा होते हुएं भी देखा हैं|"
हा डायलॉग आहे नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'गुरु' या चित्रपटातील. या चित्रपटाच्या नायकाच्या आयुष्याची सुरुवातच अपयशाने होते. 'दहावी नापास' असा शेरा बसलेला, एका खेडेगावातला मुलगा भारतातील सर्वात मोठ्या कंपनीचा मालक बनण्याचे स्वप्न बघतो. अनेक कठीण प्रसंगांवर मात करत तो खरचंच आपल्या कंपनीला भारतातील सर्वात मोठी कंपनी बनवतो. एवढ्यावरच न थांबता तो कंपनी आता जगातील सर्वात मोठी कंपनी बनवण्याचे नवीन स्वप्न बघतो. अशी या चित्रपटाची कथा.

या स्वप्नांवरूनच एक छोटीशी गोष्ट आठवते -
कोण्या एका नगराचा राजा आपल्याला वारस नाही म्हणून खूप काळजीत असतो. आपल्यानंतर राजाच्या गादीवर कोणाला बसवायचे याचा तो विचार करीत असतो. अशातच एक हुशार सेनापती राजाला युक्ती सांगतो. त्यानुसार राजा नगरातील सर्व लहान मुलांचा इंटरव्यू घ्यायचे ठरवतो. इंटरव्यूतुन सर्वात हुशार मुलाला राजाचा वारसदार म्हणून जाहीर करायचे ठरते.

नगरात दवंडी पिटली जाते. नगरातील सर्व आईवडिलांनी येत्या रविवारी आपल्या मुलांना मुलाखतीसाठी राजमहालापाशी घेऊन यावे होऽऽ मुलाखतीतून निवड झालेल्या मुलाला राजाचा वारसदार म्हणून घोषित केले जाईल होऽऽ

सर्वच आईवडिलांना आपला मुलगा राजा व्हावा असे वाटत असते. म्हणून ते आपल्या मुलाची मुलाखतीसाठी जोरात तयारी करून घ्यायला लागतात. काही आईवडिल मुलांना विशेष शिकवणी लावतात. तर काही श्रीमंत आईवडिल घरीच शिक्षक आणतात. 'मुलांनी मुलाखत कशी द्यायची?' या विषयाची पुस्तकेही खूप खपतात! होता होता रविवार उजाडतो. राजमहालापुढे सकाळपासून रांगा लागतात. मुलांबरोबर त्यांचे पालकही नवीन कपडे घालून आलेले असतात. एका महालात मुलाखती सुरु होतात. मुलाखतीला मात्र फक्त मुलांनाच आत जाण्याची परवानगी असते. राजा स्वतः मुलाखत घेत असतो.

तुम्ही इथे कशासाठी आला आहात? असा एकच प्रश्न राजा सर्व मुलांना विचारत असतो. मुले तयारीत असतात. कुणी मला मखमली गादीवर बसायला मिळेल म्हणून मी आलो आहे असे सांगतो; तर कुणी मला बदामाचा शिरा रोज खायला मिळेल म्हणून मी आलो असे सांगतो. कुणी मला काजूची खीर खायला मिळेल म्हणून आलो असे सांगतो; तर कुणी मला घोड्यावरून फिरायला मिळेल असे सांगतो. संध्याकाळ होते. सर्व मुलाखती संपतात. तेवढ्यात राजाला एक फाटके कपडे घातलेला मुलगा कोपऱ्यात उभा असलेला दिसतो. त्याचे गरिब आईवडिल कामाला गेल्यामुळे तो एकटाच दिवसभर आपल्याला कोणी बोलावेल याची वाट बघत उभा असतो. राजा त्याच्याजवळ जातो व त्याला विचारतो, बाळ तू इथे कशासाठी आला आहेस? एका क्षणाचाही विचार न करता तो मुलगा राजाच्या डोळ्यात डोळे घालून म्हणतो, मी इथे राजा व्हायला आलोय! राजा होण्याचं स्वप्न घेऊन आलेल्या त्या मुलालाच राजा आपला वारसदार म्हणून घोषित करतो.

तर मंडळी, या छोट्या मुलाप्रमाणे आपणही मोठी स्वप्न बघितली पाहिजेत. आणि गुरु चित्रपटातला नायक म्हणतो त्याप्रमाणे ती स्वप्न साकार होताहेत ना तेही बघितलं पाहिजे. त्यासाठी कितीही कष्ट घ्यावे लागले तरी त्याची तयारी ठेवली पाहिजे. आणि हो तुम्हाला काही अडचण आली, काही माहिती हवी असेल, मार्गदर्शन हवे असेल तर तुमचा हा मनोगत मित्र आहेच. दर महिन्याला मनोगत जरूर वाचा आणि यातील गोष्टी मुलांना, नातेवाइकांनाही जरूर सांगा.

दर महिन्याला मनोगत तुमची वाट पहात आहे.

## व्यवसाय करताना शोधक वृत्ती हवी




हरबा : नमस्कार केरबा
केरबा : नमस्कार. कसं काय चाललंय ?
हरबा : झकास. तुमच्या कृपेनं व्यवस्थित!
केरबा : असं म्हणतोस मग तुला आता तिकडम पाहिजेच पाहिजे. ती नसली की समज गेलाच तू बाराच्या भावात!
हरबा : तिकडम ? म्हणजे काय ?
केरबा : (हसत) तिकडम म्हणजे चष्मा, भिंग अन् आरसा यांचं त्रिकुट.
हरबा : कमालच आहे तुझी. माझे डोळे चांगले असताना कशाला पाहिजे चष्मा अन् भिंग ? आरशात बघून काय हिरो व्हायला सांगतोस की काय ?
केरबा : त्या चष्म्याबद्दल मी बोलत नाही तर जेव्हा तू गिऱ्हाइकाच्या आवडी निवडी काय आहेत, त्यांच्या अपेक्षा काय आहेत, दुसऱ्या दुकानात ते जातात का, दुसरे दुकानदार कसा धंदा करतात, हे सगळं नीट पहायला शिकलास की तुझ्याकडे चष्मा आहे असं समजायचं!
हरबा : ?
केरबा : अन् जेव्हा तू खोलात शिरून, त्याची कारणे शोधून, त्याच्यावर उपाय काढायला शिकशील तेव्हा तुझ्याकडे भिंग पण आहे असं समजायचं!
हरबा : अन् आरसा ?
केरबा : हं. आरसा म्हणजे आपण आपल्याला नीट बघायचं. जे करतोय ते बरोबर का चूक, काय नवीन केलं पाहिजे, काय शिकलं पाहिजे हे तू जेव्हा प्रामाणिकपणे करशील तेव्हा तुझ्याकडे आरसा पण आहे असं समज!
हरबा : म्हणजे या तीनही गोष्टी बरोबर ठेवूनच धंदा केला पाहिजे तर.
केरबा : अगदी बरोबर. ही तिकडम तुझ्याकडे असेल तर तुझा झकास चालणारा धंदा धावायला लागेल. मग सारखा तिकडम तिकडम करशील. चल मग निघू का आता. पण आपली तिकडम लक्षात राहील ना!
हरबा : वा रे तिकडम. चल मग पुन्हा भेटू.

# आपले आरोग्य आपल्या हाती

खालील प्रत्येक चित्रातून "कानाची निगा कशी राखावी ?" या विषयीचा काही संदेश मिळतो का ते पहा.






















## माझं घर आनंदी आहे का ?



आपलं घर सुंदर, नीटनेटकं असणं तर महत्वाचं आहेच पण घरातलं वातावरणही आनंदी, उत्साही असणं तितकंच महत्वाचं आहे. या सदरामधून आपण काही कौटुंबिक समस्यांचा विचार करणार आहोत.

### कौटुंबिक कलह आणि कुटुंब न्यायालये

दिलीप व सुनीता यांचे ठरवून लग्न झाले. त्यांना लग्नानंतर दोन मुले झाली. पण दिलीपला दारू पिण्याचे व्यसन होते. लग्नानंतर सुरुवातीचे काही दिवस बरे गेले पण नंतर दिलीपने सुनीताशी भांडणे करायला सुरुवात केली. रोज रात्री दारू पिऊन कोणत्या ना कोणत्या कारणाने सुनीताला शिव्या देणे हा दिलीपचा उद्योगच होऊन बसला. दिलीप टेलरिंगचे काम करत असला तरी निम्मा पैसा दारूतच चालला होता.

मुलाबाळांकडे बघून सुनीताने सुरुवातीला दुर्लक्ष केले. तिचे मन मात्र फार दु:खी होते. मुलेही फार कोणात मिसळत नव्हती. शेवटी तिने मुलांना घेऊन माहेरी जाण्याचा निर्णय घेतला. तर तिथेही दिलीप, सुनीता व तिच्या आईवडिलांना धमकी देऊन मुलांना घेऊन गेला.

आता मात्र सुनीताने वस्तीतील मार्गदर्शन केंद्रात जायचे ठरवले. तिथे तिला कुटुंब न्यायालयाची माहिती मिळाली. कुटुंब न्यायालयात वकिलाची गरज नसते. तिथे महिलांना आपला अर्ज दाखल करण्यासाठी पैसे भरावे लागत नाही. इथे आपल्याला समुपदेशनाचा फायदा घेता येतो. सुनीता कुटुंब न्यायालयात गेली. तिथे समुपदेशकाजवळ तिने आपली व्यथा मांडली. सल्ल्यानुसार सुनीताने प्रथम पोलिसात दिलीपविरुद्ध रितसर तक्रार नोंदवली. पोलिसांनी दोन्ही मुले सुनीताच्या ताब्यात दिली व सुनीताला मारहाण करणार नाही असे दिलीपकडून लिहून घेतले.

वस्तीतील सामाजिक कार्यकर्त्यांनी दिलीपला अल्कोहोलिक अनॉनिमसच्या गटांना पाठवायला सुरुवात केली. हळूहळू त्याच्यातही बदल झाला. आज मात्र सुनीताचं घर सुखी आहे. मुलंही आनंदात असतात.

बघितलंत वेळीच मार्गदर्शन घेतल्यामुळे सुनीता आज आनंदात आहे. बऱ्याच वेळा आपण घरातली गोष्ट घरातच ठेवू पहातो. पण गोष्टी हाताबाहेर जाण्याआधीच योग्य सल्ला घेतला तर आपले घर आनंदी ठेवण्यास नक्कीच मदत होईल, नाही का ?

## या महिन्याची गुरूकिल्ली

*ऐक माझी ओवी गं*
*जादूमंतर थांबवीन गं*
*अंगार धुपार थांबवून सगळा*
*मी बुवाबाजीला जाळीन गं*

संपर्क :१४ लॅंडमार्क अपार्टमेंट, बी. जे. रोड, साधू वास्वानी चौक, पुणे४११००१ | फोन : ०९१ (२०) २६०५ १०५३ | ईमेल : upliftindiaatul@gmail.com